# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/03/2023 (बुधवार) सकाळ

## जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत १५ कि. मी अंतरावरील मौजा पोही ता. कळमेश्वर जि. नागपुर येथे दिनांक २०/०३/२०२३ चे १७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— धनराज ज्ञानेश्वर बन्सोड, वय ३१ वर्ष, रा. वार्ड नं. ०१ पोही ता. कळमेश्वर जि. नागपुर व आरोपी नामे— कैलास गाडवे, वय ३५ वर्ष रा. पेठ बुधवार काटोल ह. मु. पोही हे नात्याने साळे जावई लागत असून घटना वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीची बहीण आरोपीची **पत्नी जखमी सौ. विजया** ही रोडने जात असता आरोपीने तिचे जवळ जावून दोन दिवस पुर्वी झालेल्या झगडयात तिने आरोपीला तू नेहमी दारू पितोस व काही कामधंदा करित नाही मला तुझेसोबत राहायचे नाही मी माझे मुलींसोबत अलग राहते असे म्हटल्याचा राग मनात धरून आरोपीने जखमीला ‘‘तू मला सोडून कशी का राहते व कशी का जगते तुला आज संपवतोच’’ अशी धमकी देवून तिचे गळयावर त्याचे जवळील ब्लेडने चिरे मारून तिला जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला होता. आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.नि यशवंत सोलसे ठाणेदार पोलीस स्टेशन कळमेश्वर मो. नं. ७०३८०४६३९९ हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मौजा MSETCL २२० के. व्ही कन्हान उपकेंद्र तारसा रोड येथे दिनांक २१/०३/२०२३ चे ०२.०० वा. ते ०६.०० वा. दरम्यान नमुद घटनावेळी व ठिकाणी चैन लिंक फैसिग कापून आतमध्ये येवुन व एका बाजुने चालु असलेले २२० के. व्ही अल्ट्राटेक आणि २२० के. व्ही. उमरेड २ चे ऑक्सीलियरी बस इसॉल्टोर चे प्रत्येकी आर आणि बी फेसचे इसुलेटर फोडून ४ नग त्यावरील कॉपरचे ब्लेड अंदाजे किंमती ५२,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— श्री धम्मरत्न महादेव मेश्राम, वय ४२ वर्ष, रा. MSETCL २२० के. व्ही कन्हान उपकेंद्र तारसा रोड यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास स.फौ. सदाशिव काठे ब. नं. ६४३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर